

**मराठी साहित्य मंडळ, कलबुरगी (गुलबर्गा)**
**या संस्थेचे त्रैमासिक**

# भाव अनुबंध

Scanned with OKEN Scanner

मराठी साहित्य मंडळ, गुलबर्गा
या संस्थेचे त्रैमासिक

# भाव अनुबंध

वर्ष : ४ अंक : ३

चैत्र, वैशाख, ज्येष्ठ शके १९४०
एप्रिल, मे, जून २०१८

---

कार्यकारी संपादक
श्री. सर्वोत्तम सताळकर
निवास (०८४७२) २५५८७८ / ०९२४२१९३७९२

संपादक मंडळ
श्री. विद्याधर मुरुगकर ★ श्री. व्यंकटेश वळसंगकर
सौ. वंदना किणीकर ★ डॉ. विजया तेलंग

---

संस्थेचा पत्ता : मराठी साहित्य मंडळ, स्टेशन बाजार,
गुलबर्गा (कलबुर्गी) ५८५१०२.
दूरभाष : कार्या. (०८४७२) २३२२०७ email-s.satalkar@yahoo.com
वेळ : सकाळी ८ ते ११ व सायं. ५ ते ८. गुरुवारी साप्ताहिक सुट्टी.

---

या अंकाचे मूल्य : रु. ५०/-
वार्षिक वर्गणी - वैयक्तिक रु. २००/-, संस्थेसाठी रु. ३००/-
वर्गणी कुठल्याही महिन्यापासून चेक, डीडी अथवा मनीऑर्डरच्या माध्यमाने 'Editor Anubandh' या नावाने पाठवावी.

(संपादकीय व व्यवस्थापकीय पत्रव्यवहार, अभिप्रायार्थ भेट पुस्तके, नियतकालिके, प्रसिद्धीसाठी साहित्य इ. कार्यकारी संपादकांच्या नावे संस्थेच्या पत्त्यावर पाठवावे. प्रसिद्धीसाठी साहित्य ईमेल वरही पाठविता येईल. या अंकातील लेखांत व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.)

Scanned with OKEN Scanner

## अंतरंग.....


- संपादकीय..... ३
- दलित साहित्य आणि सत्य-शिव-सौंदर्य विचार / प्रा. डॉ. शशिकांत. लोखंडे ८
- लोकसाहित्यातील अक्षरलेणे - उखाणा / डॉ. बाळासाहेब गुंजाळ १८
- आठवणीतले श्री. सुनील चिंचोलकर / विद्याधर मुरुगकर २६
- डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे दलित चळवळीविषयी विचार / प्रा. [illegible] २९
- घागर (कथा) / प्रा. डॉ. संग्राम गोपीनाथ थोरात ३५
- हास्यविनोद आणि मी / प्रा. विश्वास वसेकर ४२
- अरुण साधू - प्रतिभावंत आधुनिक लेखक / सर्वोत्तम सताळकर ४७
- अस्सल अनुभवांची प्रामाणिक सांगड साहित्यात यावी ! / प्रा. डॉ. चंद्रकांत पोतदार ५३
- कादंबरीकार दत्ता रघुनाथ कवठेकर यांच्याविषयी... / श्रीदेवी रामचंद्र बेळ्ळुरे ५८
- कविता.... ६१
- हिमालयातील महात्म्यांच्या सहवासात / श्री. शशिकांत किणीकर ६७
- भक्तिरंगातली वीण - संत तुलसीदास आणि सूरदास / कै. शांताबाई कमलापूरकर ७३
- नातेसंबंध कसे असावेत ? / सौ. उषा रास्ते ७७
- रेल्वे परिसरातील आठवणींची 'बखर' / प्रा. व्यंकटेश वळसंगकर ८२
- मंडळाची वाटचाल..... ८६

# घागर (कथा)

• प्रा. डॉ. संग्राम गोपीनाथ थोरात

'लाडू आरं उनात खिळू नगस' आजीनं तिसऱ्यांदा ओरडून नातवाला बोलावलं. ती म्हातारपणानं आन् आजारपणानं हातरुणाला खिळली व्हती. लाडूनं नुकतीच आपल्या सायकलवरनं पाण्याची घागर उतरून ठेवली होती; आपला आजा, बाप, आई आणि आजी यांनी ज्या दरीतनं आणि वाटंनं पाणी आणलं; त्याच वाटंनं त्योबी आला होता आणि अंगणात खेळाय गेला होता. अकरा वर्षांचा हा पोरगा खेळात दंग होता. आई-बापाविना पोरकं झालेलं हे लेकरू आजीच्या आजारपणामुळं लांब खेळायबी जायचं न्हाय. त्याचा गोरापान चुणचुणीत देह बघणाराचे लक्ष वेधून घेत होता. तो शाळेलाबी हुशार होता. त्याचं पाळण्यातलं नाव स्वानंद आसं होतं; पण त्याला बालपणापासूनच खास करून गऱ्याचे लाडू खूप आवडायचे म्हणून सगळे त्याला 'लाडू' म्हणू लागले. तो जणू आजा, बाप आणि आई यांचे गुण घेऊन जन्मला होता.

भाईर चैत्रातलं ऊन 'मी' म्हणत व्हतं. सूर्यदेव उगवल्यापासूनच 'आग' ओकत होता. झाडाला पान राह्यलं न्हवतं. ऊनाच्या झळा माणसाला भाईर पडून देत न्हवत्या. रणरणत्या ऊनानं सारा गाव करपला होता. रानातली पाखरं आन् चरायला सोडल्याली गाई-गुरं सावलीचा आधार शोधत होती. म्हशी तर तापल्याला तवा निवण्यासाठी पाण्यात ठेवावा तशा डबक्यातच बसून रहात होत्या. असं अंगाची लाहीलाही करणारं ऊन असूनही लाडूला त्याची पर्वा नव्हती. आजीला मात्र नातवाची काळजी वाटायची. तिलातरी दुसरं कोण व्हतं ? 'नाताला आजी आन् आजीला नातू' घरात इनमीन दोघंच. नातू आजीची आन् आजी नातवाची काळजी घ्यायची. तो भाईर खेळायला गेला की आजीच्या जीवाला घोर लागायचा; त्यानं सारखं घरातच बसावं असं तिचं म्हणनं न्हवतं; पण तो डोळ्यांसमोर असावा असं तिला वाटायचं. तिघांच्या मरणाचं दुःख पचवलेली

म्हातारी नातवाला जीवापाड जपत होती. तो जरा नजरेआड झाला की; हाका मारणं सुरू व्हायचं.

काळजीपोटी आजीनं पुन्ह्यांदा हाक दिली; 'आरं लाडू आलास का ?' तवा कुठं लाडू घरात ईऊन आजीपाशी बसला. घर तरी कसलं ? साध्या मातीच्या भिंती वर पाचट टाकून निवारा केल्याला. चारी बाजूला चार मिढी आन् मधी आधाराला दोन अशा सहा मिढींवर उभा असलेलं छप्पर म्हणजे त्यांचं घर. तिथंच यका कोपऱ्यात चूल आणि थुडी भांडी होती. भिंतीला चार-पाच देवांचं फोटो लटाकल्यालं. त्याच्याच पुढं लाडूचा आजा धर्मू, बाप हाणमा आन् आय बायजा यांचेबी फोटो होते. सगळं फोटो धुरानं पार धुरकाटलं होतं. भिंतींना दिलेला निळा रंग धुरानं काळपट झाला होता. भिंतीचं पोपडं निघाल्यानं त्यात ढेकणांनी आपली घरं केली होती. किडे, मुंग्या, पाली, झुरळं आन् ढेकणं यांचं ते जणू माहेरघरच होतं. उन्हाळ्यात तापायचं, पावसाळ्यात गळायचं आन् हिवाळ्यात गारठायचं असं त्यांचं छप्परवजा घर. घरात म्हातारी आजी आन् तिचा नातू राहत होते म्हणून घर म्हणायचं न्हायतर त्यो गुरांचा गोठाच म्हणायचा.

"आजे, पाणी पायजेल का ?" लाडूनं इचारलं.

"न्हाय बाबा इचूकाट्याचं उनात खिळतूयास; उन्हाळी लागंल म्हणून बुलिवलं."

"आगं आजे, मी लांब न्हाय जात हितचतर हाय" लाडू म्हणाला.

"आरं पोरा उन किती पडलंय, तवा तुजी काळजी वाटती."

काळजीच्या सुरात आजीनं सांगीतलं. लाडू हसला आन् म्हणला,

"आजे, कशाला यवडी काळजी करतीस गं, मी आता लहानय व्हय."

आजीनं लाडानं त्याच्याकडं बघितलं आन् म्हणाली, "माझ्यासाठी प्वार काय आणि नातू काय मोठा सायब जरी झाला तरी बारकाचकी." बोलत बोलत तिनं त्याच्या तोंडावरनं हात फिरावला. लाडू थोडा ओशाळला आन् त्यानं आंगणात थूम ठोकली.

आजीच्या तोंडावल्या सुरकुत्या खुलल्या; पण लगीच नाताच्या काळजीनं ती पुटपुटली, 'देवा माज्या नंतरनं याचं काय व्हणार रं !' डोळं पुसून आड्याकडं बघत ती मेल्यागत पडली. तिच्या डोळ्यापुढनं पूर्वायुष्याचा पट अलगद सरकू लागला.

त्यांचं आंबवडे गाव चारी बाजूंनी डोंगरांनी वेढलेलं. चारी दिशांना चार डोंगर होते. पूर्वेचा पूर्वेश्वर तर उत्तरेचा उत्तरेश्वर, पश्चिमेचा मावळतीचा डोंगर तर



Scanned with OKEN Scanner

दक्षिणेचा दक्षिणेश्वर. प्रत्येक डोंगरावर शंकराचं देऊळ, त्यामुळं श्रावणात लोकांची रिघ असायची. कॉलेजातली आन् शहरातली लोकंबी फिरायला यायची. पावसाळ्यात डोंगर हिरवेगार असायचे. दऱ्या-खोऱ्या रानफुलांनी फुललेल्या असायच्या. झरे व छोटे-छोटे धबधबे वाहायचे. धुके डोंगरावर उतरले की ते धबधबे स्वर्गातून जणू पांढऱ्या दोऱ्या सोडल्याप्रमाणे वाटायचे. अशी निसर्गानं गावावर रंगांची उधळण केल्याली. पावसाळ्यात धो धो पाऊस; पण उन्हाळ्यात मात्र पाण्याचा ठीपूस न्हाय. गावातली लोकं फुलांना, झाडांना, वेलींना जपायची; पण गाव बघायला आलेली शहरातली लोकं उन्हाळ्यातील वाळक्या गवतावर काडी टाकायचे. त्यामुळं सारे डोंगर काळवंडून जायचे. असं हे सह्याद्रींच्या रांगांमधलं जावळी खोऱ्यातलं छोटंसं गाव. पावसाळ्याच्या चार महिन्यांत यवढा पाऊस पडायचा की बोलायची सोय न्हाय. नळयोजनेच्या तुटीतनं गढूळ पाण्यासंगं गांडूळं यायची. उन्हाळा मात्र कोरडा ठण्. गावाच्या पूर्वेकडच्या पूर्वेश्वर डोंगराच्या आंबेदरीत मात्र बारा महिने झऱ्याला स्वच्छ पाणी असायचं. त्या दरीत आंब्यांच्या झाडांची भलीमोठी रांग होती म्हणून त्या दरीला 'आंबेदरी' नाव पडल्यालं. पाण्यासाठी गावकऱ्यांना डोंगर पार करून जावं लागायचं. बाया-बाप्यांचा जीव अगदी मेटाकुटीला यायचा. या गावात सोयरीक करायला कोणबी तयार नसायचं. अहो हा गाव म्हणजे यका अर्थानं नरकच. लोकं म्हणायची, 'एक परास पुरगी नरकात धाडू, पण आंबावड्यात नगरं बबा.'

असं हे वीस घरांचं इटूकलं गाव. त्या गावात घरातच पाटीलकी असणारी पुतळा पाटलीण राहात होती. बाय तशी लय धीराची. साऱ्या गावाची पुतळामावशी; गावातल्या प्रत्येकाच्या आडीनडीला ती 'उभा' असायची. तिचं लगीन तिच्या बानं धर्मू पाटलाशी लावून दिल्यालं. पाटील कसलंवं घरात नावालाच पाटीलकी; पण धर्मूला पंचक्रोशीत मान व्हता. दिसायला सावळाच पण ऐटबाज गडी. पण घरातली इकडची काडी तिकडं करायचा न्हाय. पुतळामावशी मोलमजुरी करून यकलीच संसार वडायची. पाणी आणून कटाळली की म्हणायची, 'आवं पाटील, झऱ्याचं पाणी आणाया इच्छा कधी वाटलं.' धर्मू हसायचा नू म्हणायचा, 'तुला आणतो सवत म्हंजी तुमी दुघी हाणाल पाण्याचं आवतं.' मग दोघंबी खळखळून हासायची आन् हसता हसताच एकरूप होऊन जायची. अशातच पुतळा पुटुशी ऱ्हायली. मग मात्र धर्मूनं हातात घागर घितली. तो दररोज दरीत पाणी आणाय जायचा.

गावकरी त्याची टिंगल करायचे. म्हणायचे, 'पाटील, संसार मागं लागला



Scanned with OKEN Scanner

वाटतं.' त्यो नुसताच हसायचा, बोलायचा न्हाय; पण उत्तरादाखल कवाबवा म्हणायचा, 'आवं आईची मया आणि बायकूचं प्रेम यावरच माणसाचं आयुष्य उभा आसतं बाबांनो'.

असं दिवसा मागनं दिवस चाललं व्हतं. बायकूला काय हवं काय नको हे बघण्यातच धर्मूचा दिवस संपून जायचा. त्यानं गल्लीतल्या पारूमावशीला पुतळाची काळजी घ्यायला सांगितलं व्हतं. त्यो सकाळ-संध्याकाळ दरीतनं पाण्याच्या चार चार खेपा आणायचा. कधी-कधी सायकल घिऊन जायचा. डोंगराच्या पायथ्याशी असणाऱ्या मारूतीच्या देवळापाशी सायकल ठिवून दरीकडं पायवाटनं जायचा. तो नावाप्रमाणेच धार्मिक असल्याने मारूतीचं दर्शन चुकवत नसे. त्याची शनिवारची रुईच्या पानांची माळ आणि दररोजची मंदिरवारी चुकत नसे. गावकरी त्याला 'देवाचा धर्मू' म्हणायचे. धर्मूबी म्हणायचा माझ्या पोराचं नावबी मी मारूतीच्या नावावरनचं ठेवणार. त्याला पैलवान करणार. हनुमानासारखा बलवान करणार.

पुतळाचे आता नऊ महिने भरले होते. त्यामुळं धर्मूच्याबी जीवात जीव न्हवता. तो झटपट कामं उरकून घरी यायचा. ती घाबरायची तवा धर्मू तिला धीर द्यायचा. तो पुतळाला म्हणायचा, 'अगं घाबरू नगंस मारूती आपल्या पाठीशी हाय.' घरात दुसरं बायमाणूस नसल्यानं त्योबी मनातून घाबरला होता. त्याचा पाण्याचा दिनक्रम सुरूच होता.

अशाच एका शनिवारी पुतळाच्या कळा वाढल्या. धर्मूला काय करावं ते सुचेना. त्यानं पारूमावशीला निरोप धाडला. पारूमावशीनं दोन दायांना अगोदरच सांगून ठेवलं होतं. त्या तिघीबी तयारीनिशी आल्या होत्या. पुतळाच्या ओरडण्यानं धर्मूच्या जीवाची उलघाल झाली. त्यानं घागर उचलली आणि आंबदरीची वाट धरली. सायकल सुसाट वेगानं निघाली; पण त्याचं मन मात्र पुतळाभोवती घुटमळत होतं. त्यानं मंदिरापाशी सायकल लावून मारूतीरायाचं दर्शन घेऊन साकडं घातलं. तो झपाझप पायवाटनं काट्याकुट्याचा विचार न करता वाट गिळत निघाला. जणूकाही त्याची वाऱ्याशी स्पर्धाच सुरू होती. दरीतनं घागर भरून तो डोंगरमाथ्यावर आला. डोंगरउतारानं त्याचं पाय चाकासारखं पळत होतं. पायवाट सोडून त्यानं आडमार्गाचा रस्ता स्वीकारला; पण तोच रस्ता त्याच्या जीवनाचा रस्ता संपवणारा ठरला. त्याचा पाय अचानक एका कपारीवरून घसरला तो खोल दरीत कोसळला. त्यानं घागर घट्ट धरली होती.

इकड पुतळानं एका गोंडस मुलाला जन्म दिला. बाळ-बाळंतीण सुखरूप



Scanned with OKEN Scanner

होते. पारूमावशीला बाळात धर्मूची छबी दिसली. ती धर्मूची वाट पाहत होती. पुतळाही आता सावध झाली होती. तिचं डोळं धर्मूच्या वाटंकडं लागलं होतं. असंच उठावं आणि बाळाला घेऊन मंदिराकडं जावं असं तिच्या मनात येई पण ते शक्य नव्हते.

दुपार सरली होती सूर्य पश्चिमेकडे कलला होता. पुतळा कानोसा घेत होती. सायकलचा आवाज आला. तिचं मन मोहोरलं, अंग शहारलं. घराचं कवाड वाजलं, रिती घागर घेऊन पांडू घरात आला. पुतळाच्या काळजात धस्स झालं. तिनं विचारलं, 'दादा, माझं धनी कुठयतं ?' पांडूला हुंदका आवरला नाही. तशी पुतळाची घालमेल वाढली. तिचं लेकरू मात्र शांतपणे निजलं होतं. पारूमावशीनं पुतळाला अंगणात नेलं. धर्मूचा रक्तबंबाळ देह बघून तिनं हंबरडा फोडला. तिच्या आवाजानं जणू तिचं लेकरू जागं झालं. बाळाच्या रडण्याचा आवाज ऐकून पुतळा सावरली. तिनं धर्मूच्या तोंडावरनं हात फिरवला आणि दाराकडं बघत उद्गारली, 'हाणमा मी हाय रं' आणि त्याच्या संगोपनासाठी ती सज्ज झाली.

दिवसामागून दिवस गेले. अंगणात दुडुदुडु धावणारा हाणमा मोठा झाला. पुतळानं त्याच्यासाठी सारं दुःख गिळलं. त्याला आईबरोबरच बाचंबी प्रेम दिलं. हाणमाच्या शरीरानं आकार घेतला तो धर्मूसारखा रूबाबदार दिसू लागला. गावकरी त्याला 'धर्मूचा हाणमा' म्हणू लागले. हाणमा पाणी आणायलाही मदत करू लागला. किटलीनं, छोट्या कळशीनं पाणी आणणाऱ्या हाणमानं आता हातात घागर घेतली होती. तो आईला म्हणायचा, 'आये, आपल्या नळाला कागं पाणी येत न्हाय, नुसतंच नळ जुडून ठेवल्यात.'

पुतळा म्हणायची, मोठा झाल्यावर तू गावाचं दुःख दूर कर. हाणमाच्या लग्नाचा विचार आता तिच्या मनात घोळू लागला. शेजारच्या पारगावातली तिची चुलतभाची बायजा तिच्या मनात भरली होती. रानपाखरासारखी विहरणारी बायजा नाकीडोळी निटस होती. पुतळाचा भाऊबी तिच्या शब्दाबाहेर नव्हता. यायजायलाबी वाट राहिल म्हणून पुतळानं दोघांना संसार थाटून दिला. दोघंबी संसारात रमली; पण पाणी मात्र त्यांची पाठ सोडत न्हवतं. जोडीनं पाणी आणण्याचा कार्यक्रम सुरू झाला तवा कुठं पुतळाच्या देहाला इसावा मिळाला; पण त्या इसाव्यामुळंच तिचं शरीर ठणकायला लागलं. रात्रं-दिवस कामात असणारी पुतळा या व्याधीनं त्रस्त झाली. हालचाल बंद झाल्यानं तिनं हळूहळू हातरुणच धरलं.

सुखानं खाण्याचं दिस आलं होतं; पण त्यालाबी कुणाचीतरी नजर लागली.



Scanned with OKEN Scanner

बायजा बाळांतपणात दगावली. तिनं पोराला जन्म दिला आन् देवाघरी गेली. एका डोळ्यात हासू आन् दुसऱ्या डोळ्यात आसू अशी पुतळाची अवस्था झाली. तिच्या मागचं दु:ख संपता संपत न्हवतं. नवरा गेल्यावर मुलासाठी जगणारी पुतळा आता सून गेल्यावर नातवाच्या काळजीनं खंगून गेली. रात्रंदिवस पोराची आन् नातवाची काळजी करू लागली.

बायकूच्या जाण्यानं हाणमाबी खचला. भ्रमिष्टासारखा फिरू लागला. दिवसातनं एकदा कधीबी घरी यायचा, पोराला बघायचा नि निघून जायचा. आयचा जीव तीळ तीळ तुटायचा. ती त्याला बसवून चार घास भरवायची. त्यो मधीच इचारायचा, 'माझी बायजा कुठंय ?' आन् भरल्या ताटावरनं उठून जायचा. त्याच्या हातातून पाण्याच्या घागरी बरोबर जीवनबी सुटलं होतं. असं करता करता त्यो घरीबी यायचा बंद झाला. त्यो गावकऱ्यांच्या चर्चेचा विषय झाला. गाव तोंडाला इल त्ये बोलू लागलं. कुणी म्हणायचं त्यो जंगलात राहतो, कुणी म्हणायचं दरीत पडून मेला, खरं कुणालाच काय ठावं न्हवतं. पुतळानं मात्र पुन्हा एकदा नातवाच्या संगोपनासाठी कंबर कसली. हातात घागर घेऊन कामाला लागली....

"आजे, जेवायला दिऊ का ?" या लाडूच्या आवाजानं आजी भानावर आली. तिनं डोळं पुसलं आणि उठून बसली. लाडूनं आजीला थोडा भात चारला, स्वत:बी खाल्ला आणि घागर घेऊन आज्याची सायकल घेऊन पाण्याला निघाला. आजीनं जपून जाण्याचा सल्ला दिला. आन् ती आढ्याकडं बघत निपचीत पडली. लाडू पारापासनं जात असताना म्हाताऱ्या पांडूनं त्याला जवळ बसवून त्याच्या घरचा सारा इतिहास सांगितला. आजोबाचं कर्तृत्व, बापाची गावाविषयीची तळमळ, आईचा मायाळू स्वभाव व आजीचा करारी स्वभाव. या साऱ्या गोष्टींची त्याला जाणीव झाली. आज्याचं अपघाती व आईचं बाळांतपणातलं मराण, बापाचं परागंदा होणं या आठवणींनी त्याच्या बालमनाला चुटपुट लागली. अशा विमनस्क अवस्थेतच त्यानं पांडूकाकांचा निरोप घेतला. डोंगरउतारावर जाताच त्यानं आज्याप्रमाणं मारूतीचं दर्शन घेतलं. सायकल लावली आणि डोंगर चढायला सुरुवात केली; पण त्याचं चित्त थाऱ्यावर न्हवतं. आजोबाचा गावातील रूबाब, 'आये आपल्या नळाला कागं पाणी येत न्हाय, नुसतंच नळ जुडून ठेवल्यात' असा बापानं आजीला केलेला प्रश्न यांनी त्याच्या डोक्यात थैमान घातलं. त्यानं डोंगरमाथ्यावर गेल्यावर सारं शिवार व गाव न्याहाळलं. सारा परिसर डोळ्यांत



Scanned with OKEN Scanner

भरून घेतला. गावाकडं पाठ करून दरीतल्या झऱ्याकडं त्यानं एकदा नजर टाकली आणि 'बाबा, तुमचं स्वप्न मी पुरं करणार' अशी आरोळी ठोकली. त्याच्या बालमनात काय घोळत व्हतं काय माहीत ? पण त्याच्या पायानं वेग घेतला होता. दरीतनं घागर भरून घेऊन वर आला व तो वेगानं डोंगर उतरू लागला. कधी एकदा जाऊन आजीला भेटतोय असं त्याला झालं होतं.

त्यानं सायकल लावली आणि पळतच घर गाठलं. अंगणातूनच आज्जे ऽऽ आज्जेऽऽ अशी हाक मारत त्यानं घरात प्रवेश केला. त्यानं सांगायला सुरुवात केली, 'आजे, मला एक कल्पना सुचलीय, मी शिकून मोठा इंजिनियर होणार आणि डोंगराला बोगदा पाडून झऱ्याचं पाणी गावात आणणार, गावाचं दुःख दूर करणार. माझ्या आज्याचं, बाचं स्वप्न पुरं करणार. आपल्या गावातल्या कुणाचीबी घागर आता रिती ऱ्हाणार न्हाय. कुणालाबी पाण्यासाठी पायपीट करावी लागणार न्हाय. आज्जे, तुमच्या पिढीनं आमच्यासाठी लय केलं; पण आता काळजी न्हाय करायची तुजा हा नातू तुला वचन देतो की, माझं पुरं आयुष्य मी गावासाठी खर्च करीन. आन् आज्जे, तूबी मला शंभर वर्ष जगण्याचं वचन दे; मला तुझ्या कष्टाचं पांग फेडायचेत. तुला लय दुःख सहन कराय लागल्यात; पण तू कधीबी रडली नाहीस. आज्जे, कधी कधी मला प्रश्न पडतो यवडी ताकद तुला इती कुठनं ? लय दिवस झालं माझ्या मनात हे सारं बोलायचं होतं बघ ! आज माझं मन मोकळं झालं. मी आता तुला त्रास न्हाय देणार, फक्त अभ्यास करणार, आन् आज्जे तुला सुखात ठेवणार बघ.'

पाण्याची घागर ठेवताना तो बोलत होता. घागर ठेवायला वाकलेल्या स्थितीतच त्यानं 'आजे, ऐकतीयस ना ?' म्हणून मागं वळून बघितलं. आजी त्याच्याकडंच बघत होती; तिचे डोळे सताड उघडे होते पण...... तिच्या डोळ्यांतून प्राण कधीच निघून गेला होता.

**- प्रा. डॉ. संग्राम गोपीनाथ थोरात**
साहाय्यक प्राध्यापक, मराठी विभाग,
किसन वीर महाविद्यालय, वाई
मोबा. : ९६०४०४६०८४

★ ★ ★



Scanned with OKEN Scanner